10 SEP 2026

वर्तमान

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना सत्यात उतरण्यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन महत्वाचे : प्रा.डॉ.पी.एस.पाटील



**कोल्हापूर/प्रतिनिधी :**
शैक्षणिक जीवनात विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना सत्यात उतरण्यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन महत्वाचे असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू तथा डी.वाय.पाटील एज्युकेशन सोसायटीच्या आंतरविद्याशाखीय संशोधन केंद्राचे संशोधन संचालक प्रा.डॉ.पी.एस.पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व समन्वयक, सहा.प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यासाठी माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्ताने शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू तथा डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीच्या आंतरविद्याशाखीय संशोधन केंद्राचे संशोधन संचालक प्रा.डॉ.पी.एस.पाटील यांचे शिक्षक : विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारा मार्गदर्शक' या विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.अध्यक्षस्थानी संचालक प्रा.डॉ.प्रतिभा पाटणकर होत्या. यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, प्रा. डॉ.ए.एम.गुरव, डॉ.शशिकांत पंचगल्ले, डॉ.प्रल्हाद माने,ऍड.अनिल घाटगे विविध अभ्यासकेंद्राचे शिक्षक, सहा.प्राध्यापक, समन्वयक,विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते.

प्रा.डॉ.पाटील म्हणाले की,प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःची ओळख होणे महत्वाचे आहे.आपली आवड कशात आहे हे ओळखता येणे महत्वाचे आहे. आपण आई – वडील,मित्र – मैत्रिणीशी बोलतो परंतु स्वताशी बोलत नाही.विद्यार्थ्यांनी स्वतःशी बोलले पाहिजे.आपला आतला आवाज ओळखता आला पाहिजे. माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन व माजी राष्ट्रपती ए.पी.जे अब्दुल कलाम यांचे विचार विद्यार्थी आणि शिक्षकांनी आत्मसात केले पाहिजेत.


विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या नात्यातून व्यक्तिमत्वाची जडणघडण होत असते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना देण्यासाठी ज्ञान आणि कौशल्य आत्मसात केले पाहिजे. सक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षकांनी सक्षम असले पाहिजे. समाज आणि देशाच्या विकासासाठी योगदान देण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक विचार दिला पाहिजे.असे प्रा.डॉ.पाटील म्हणाले.

यावेळी स्वागत व प्रास्ताविक समन्वयक डॉ.कृष्णा पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय ऑनलाईन एम.बी.ए कोर्स को-ऑर्डीनेटर डॉ.नगीना माळी यांनी करून दिला.सूत्रसंचालन सहा.प्राध्यापक डॉ.सचिन पाटील यांनी केले.आभार समन्वयक डॉ.सुर्यकांत गायकवाड यांनी मानले.

10 SEP 2026

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आरउंट व्ह्यू





## शिवाजी विद्यापीठात फुलले 'कास'...!

श्रावणातल्या ऊन-पावसाचा खेळ सुरू झाला की त्याबरोबर रानपुष्प बहराला सुरवात होते. सातारा जिल्ह्यातील कास पठार हे खास त्याच्या अशा पुष्पवैभवासाठी ओळखले जाते. शिवाजी विद्यापीठाच्या परिसरातही याच वेळेला विविध रानफुलांच्या बहराला सुरवात होत असते. यंदाही अशी अनेक रानफुले विद्यापीठाच्या परिसरात बहरली आहेत.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2026
आपलं व्हय

# विद्यापीठात मोडी लिपी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या मार्फत ६ महिने कालावधीच्या 'मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रमा'साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक उमेदवारांना २८ सप्टेंबरपर्यंत प्रवेश घेता येईल. या अभ्यासक्रमासाठी किमान शैक्षणिक पात्रता पदवी आवश्यक आहे.

शिवपूर्वकाळापासून ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषे बरोबरच मोडी लिपीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता. त्यामुळे या कालखंडातील इतिहास समजून घेण्यासाठी, संशोधनासाठी आणि प्रशासकीय दस्तऐवज उलगडण्यासाठी मोडी लिपीचे ज्ञान असणे अत्यंत गरजेचे आहे.

सध्याच्या काळात सामाजिक शास्त्रांच्या विद्यार्थ्यांपुढे रोजगाराची समस्या असताना, मोडी लिपीसारखे कौशल्य रोजगाराचे नवे मार्ग खुले करू शकते. १९६० पूर्वीच्या शेतीविषयक नोंदी, जन्म-मृत्यूच्या नोंदी, खरेदीखते आणि जुने न्यायालयीन दावे यांसारखी सर्व महत्त्वाची कागदपत्रे मोडी लिपीतच उपलब्ध आहेत.

या कागदपत्रांचे लिप्यांतर करून देण्याचे काम करून व्यावसायिकदृष्ट्या उपजीविकेचे साधन निर्माण करता येते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2026
लोकमत

# युवा संसदेसाठी माने राष्ट्रीय परीक्षक



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. प्रल्हाद माने यांची भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित १८व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी समूह समन्वयक व राष्ट्रीय परीक्षक म्हणून निवड झाली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2026

सिंधुदुर्ग समाचार

# पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे शिवाजी विद्यापीठात आयोजन

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने, ISHRAE व RASSS यांच्या सहकार्याने आणि सस्टेनेबिलिटी क्लबच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आली आहे. सण साजरा करताना पर्यावरणाचे संरक्षण व्हावे आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना समाजात रुजावी, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत कागदाच्या लगद्यापासून (Paper Pulp) पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कशी तयार करावी, याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण सहभागींना देण्यात येणार आहे. नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून गणेशमूर्ती तयार करण्याची पद्धत यावेळी शिकविण्यात येईल. या कार्यशाळेसाठी श्रद्धा योगेश साटम संसाधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. त्या Visual Art मध्ये पदव्युत्तर, BVA तसेच Art Education आणि Drawing & Painting (G.D. Art) क्षेत्रातील शिक्षण घेतलेले आहेत.

कार्यशाळेची नोंदणी फी केवळ १५० असून, नोंदणीकृत सहभागी व्यक्तींना त्यांनी तयार केलेली गणेशमूर्ती स्वतःसोबत घेऊन जाता येणार आहे. शुल्काचा भरणा घटनास्थळी करता येईल.

कागदाच्या लगद्यापासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची कला शिकण्यास इच्छुक विद्यार्थी, नागरिक, गणेशभक्त आणि पर्यावरणप्रेमींनी या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी दिलेल्या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

10 SEP 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ओझोन दिनानिमित्त विद्यापीठात पोस्टर स्पर्धा

प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक ओझोन दिनानिमित्त विविध पर्यावरणपूरक उपक्रमांसह पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विभागप्रमुख डॉ. असावरी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा होणार आहेत.

दरवर्षी १६ सप्टेंबर रोजी जागतिक ओझोन दिन साजरा केला जातो. ओझोन थराचे महत्त्व, पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि पर्यावरणीय समस्यांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जागतिक ओझोन दिनाच्या अनुषंगाने पर्यावरणशास्त्र विभागात दरवर्षी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

यावर्षी या उपक्रमांतर्गत रिसर्च पोस्टर स्पर्धा, बेस्ट फ्रॉम वेस्ट कॉम्पेटेशन आयोजित केली आहे. या दोन्ही स्पर्धा शुक्रवार, ११ रोजी घेण्यात येणार आहेत. पर्यावरणीय आव्हाने, त्यावरील संशोधन, नाविन्यपूर्ण उपाययोजना आणि शाश्वत विकास याबाबत विद्यार्थ्यांना आपले विचार, संशोधन पोस्टरच्या माध्यमातून मांडता येणार आहे. तसेच दैनंदिन जीवनातील टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून उपयुक्त, सर्जनशील आणि नाविन्यपूर्ण वस्तू तयार करता येणार आहेत.

10 SEP 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक ओझोन दिनानिमित्त पोस्टर स्पर्धेचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने, 'ईशरे व रास' यांच्या सहकार्याने जागतिक ओझोन दिनानिमित्त शुक्रवारी (दि. ११) विविध पर्यावरणपूरक उपक्रम, स्पर्धांचे आयोजन केले आहे.

१६ सप्टेंबर रोजी जागतिक ओझोन दिन साजरा केला जातो. ओझोन थराचे महत्त्व, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने इन्व्हायरमेंट रिसर्च पोस्टर कॉम्पिटिशन आणि बेस्ट फॉरम वेस्ट कॉम्पिटिशन या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. 'इन्व्हायरमेंटल चॅलेंजेस अँड सस्टेनेबल सोल्युशन' या विषयावर पोस्टर स्पर्धा होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : शैक्षणिक जीवनात विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना सत्यात उतरण्यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन महत्वाचे असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू तथा डी.वाय.पाटील एज्युकेशन सोसायटीच्या आंतरविद्याशाखीय संशोधन केंद्राचे संशोधन संचालक डॉ.पी.एस.पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठात शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

जनसंपर्क कक्ष
ावाजी विद्यापीठ, कोल्हापू
10 SEP 2026
पुण्यनगरी

# श्रुतिका शेवाळे विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत



**कोगे :** कळंबे तर्फ कळे, ता. करवीर येथील आनंदी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आनंदी फार्मसी कॉलेजची विद्यार्थिनी श्रुतिका शेवाळे हिने शिवाजी विद्यापीठांतर्गत घेतलेल्या बी. फार्मसी परीक्षेत उज्ज्वल यश मिळवले. तिने विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आठवे स्थान पटकावले असून, ८.५ सीजीपीए मिळवत महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत मानाचा तुरा रोवला आहे. बी. फार्मसीच्या प्रथम वर्षापासून अंतिम वर्षापर्यंत सातत्यपूर्ण शैक्षणिक कामगिरी करत श्रुतिकाने हे यश मिळवले. या कामगिरीबद्दल अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, सचिव डॉ. विद्या देसाई, प्राचार्य डॉ. सुरेश किल्लेदार, उपप्राचार्य डॉ. राहुल आडनाईक यांनी श्रुतिकाचे अभिनंदन केले.